| | | | |
|---|---|---|---|
| | दाखल तारीख | : | १०/११/२०२१ |
| | नोंदणी तारीख | : | १०/११/२०२१ |
| | निकाल तारीख | : | १६/०७/२०२६ |
| | कालावधी | : | **०४ व ०८ म. ०६ दि.** |

**भाग – 'अ'**
(न्यायनिर्णयाचे शिर्ष पृष्ठ)
(फौजदारी पुस्तिकाचे प्रकरण ६ चे परिच्छेद क्र.४४ (२))

| | | |
|---|---|---|
| **MHWS040021252021** | | **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मंगरूळपीर यांचे न्यायालय**<br>**( न्यायाधीश–ख्वाजा चॉ. कलाल )**<br>**(न्यायनिर्णय दिनांक १६/०७/२०२६)**<br>**संक्षिप्त फौजदारी प्रकरण क्र.१४१६/२०२१**<br>**निशाणी क्र.११ खाली** |
| | | प्रथम खबरी अहवाल/गुन्हा व पोलीस ठाणेचा तपशिल |
| तक्रारदार/फिर्यादी | | महाराष्ट्र शासन तर्फे<br>पोलीस ठाणे अधिकारी,<br>पोलीस ठाणे, मंगरूळपीर,<br>ता.मंगरूळपीर, जि.वाशिम. |
| प्रस्तुतकर्ता | | सहाय्यक सरकारी अभियोक्ता<br>**श्री. व्ही. डी. आरू** |
| आरोपी | | **विठ्ठल नारायण गुजरे,**<br>वय : ५६ वर्षे, धंदा : मजुरी,<br>रा. मंगलधाम, मंगरुळपीर, ता. मंगरूळपीर, जि. वाशिम. |
| प्रस्तुतकर्ता | | श्री. एस. आर. जाखोटीया |

**भाग–ब**
(फौजदारी पुस्तिकाचे प्रकरण ६ चे परिच्छेद क्र.४४ (२))

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ११.०४.२०२१ |
| प्रथम खबर अहवालची तारीख | ११.०४.२०२१ |
| दोषारोपपत्राची तारीख | २३.०४.२०२१ |
| दोषारोप ठेवण्यात आल्याची तारीख | २८.०४.२०२६ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | १५.०६.२०२६ |
| न्यायनिर्णयाकरिता राखीव केल्याची तारीख | १६.०७.२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | १६.०७.२०२६ |
| शिक्षेची तारीख, असेल तर | निरंक |

**आरोपीचा तपशील** —

| आरोपी चा दर्जा | आरोपीचे नाव | अटक तारीख | जमानत तारीख | गुन्हयाचे विवरण | शिक्षा किंवा निर्दोष | शिक्षेचा कालावधी | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४२८ नुसार कारावासाचा अवधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | विठ्ठल नारायण गुजरे | फो. प्र. सं.चे कलम ४१—अ अन्वये | २८.०४. २०२६ | भा.दं.वि.चे कलम २९४ व ३२३ अन्वये | निर्दोष | निरंक | लागू नाही. |

**भाग—'क'**
(फौजदारी पुस्तिकाचे प्रकरण ६ चे परिच्छेद क्र.४४ (३))
सरकारी/आरोपींचे/न्यायालयाचे साक्षीदारांची यादी

**अ. — सरकारी साक्षीदार :—**

| दर्जा | नाव | पुराव्याचा प्रकार (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, प्रख्यात साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, ईतर साक्षीदार) |
|---|---|---|
| १. | ज्योती राहुल गुजरे | फिर्यादी |
| २. | राहुल विठ्ठल गुजरे | साक्षीदार |

**ब. — आरोपीचे साक्षीदार :—**

| दर्जा | नाव | पुराव्याचा प्रकार (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, प्रख्यात साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, ईतर साक्षीदार) |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. — न्यायालयाचे साक्षीदार :—**

| दर्जा | नाव | पुराव्याचा प्रकार (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, प्रख्यात साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, ईतर साक्षीदार) |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

सरकारी/आरोपीचे/न्यायालयातील निशाणी दस्तऐवज.

**अ. — सरकारी दस्तऐवज :—**

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

ब. — बचावपक्ष दस्तऐवज :—

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन. |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

क. — न्यायालयीन दस्तऐवज :—

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

ड. — साहित्य/वस्तू :—

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | — | — |

## न्या य नि र्ण य
## (घोषीत दिनांक १६/०७/२०२६)

१. आरोपीचे विरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम २९४ व ३२३ अन्वये खटला चालविण्यात आला.

### अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे —

२. घटना दिनांक ११.०४.२०२१ रोजी सायंकाळी ०५.३० वाजण्याच्या सुमारास फिर्यादीच्या घरासमोर मौजे मंगलधाम मंगरूळपीर, ता. मंगरूळपीर, जि. वाशिम येथे घडली. सदर दिवशी, वेळी व ठिकाणी फिर्यादीचा मुलगा व फिर्यादीच्या दिराची मुलगी हे खेळत असताना फिर्यादीच्या मुलाची बॅट फिर्यादीच्या दिराच्या मुलीला लागली. त्यामुळे फिर्यादीची जाउ संगिता व फिर्यादीमध्ये बोलचाल झाली होती. त्यानंतर फिर्यादीने तिचे सासरे विठ्ठल नारायण गुजरे यांना सांगितले की, ‘‘संगिताला समजावून सांगा, ती माझ्यासोबत वाद करीत आहे’’. त्यावर फिर्यादीचे सासरे यांनी फिर्यादीला म्हटले की, ‘‘तु घर खाली कर, तु छिनाल आहे’’ व त्यांनी फिर्यादीला चापटाने मारून अश्लील भाषेत शिवीगाळ केली. त्यामुळे फिर्यादीने आरोपीविरुध्द मंगरूळपीर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार आरोपी विरुध्द गुन्हा रजिस्टर क्रमांक २०९/२०२१ दाखल झाला. सदर गुन्हयाच्या तपासांती सपोउपनि मोहनसिंग जाधव यांनी आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

३. आरोपीचे विरुध्द भारतीय दंड संहिता, कलम २९४ व ३२३ अन्वये गुन्हा केल्याचा प्रतिकथन निशाणी क्र.११ वर ठेवले. आरोपीने गुन्हा कबूल न करता संपरिक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शविली. आरोपीचे विरूद्ध फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) अन्वये जबाब नोंदविण्यात आला नाही. आरोपीतर्फे एकही साक्षीदार तपासण्यात आला नाही.

**४.** अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. डी. आरू व आरोपीतर्फे श्री. एस. आर. जाखोटीया यांचा युक्तिवाद ऐकला. अभियोग पक्षाची हकीकत, न्यायालयासमोर आलेला साक्षीपुरावा आणि उभयंताचा युक्तीवाद विचारात घेता पुढील वादप्रश्न उपस्थित होत असुन त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदविण्यात येत आहे.

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | दिनांक ११.०४.२०२१ रोजी सायंकाळी ०५.३० वाजण्याच्या सुमारास फिर्यादीच्या घरासमोर मौजे मंगलधाम मंगरूळपीर, ता. मंगरूळपीर, जि. वाशिम येथे, आरोपीने सार्वजनिक ठिकाणी फिर्यादी सौ.ज्योती राहुल गुजरे हीस ''तु घर खाली कर, तु छिनाल आहे'' अशी अश्लील भाषेत शिवीगाळ केली व त्यायोगे त्याने भा.दं.संहितेचे कलम २९४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्ष शाबीत करतो काय ? | ....... नकारार्थी |
| २) | वरील दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपीने फिर्यादीस थापडा, बुक्क्यांनी, मारहाण करून इच्छापुर्वक दुखापत केली असल्याचे व त्यायोगे त्याने भा.दं.संहितेचे कलम ३२३ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्ष शाबीत करतो काय? | ....... नकारार्थी |
| ३) | काय आदेश ? | ....... अंतिम आदेशान्वये |

<u>**कारणमिंमासा**</u>

<u>**वादप्रश्न क्रमांक १ व २ करिता**</u> **:—**

**५.** वादप्रश्न क्र.१ व २ हे एकमेकांशी निगडीत असल्याने त्यांचे विवेचन एकत्रितरित्या करण्यात येत आहे. अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.१ ज्योती राहुल गुजरे (फिर्यादी) व अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.२ राहुल विठ्ठल गुजरे यांनी अभियोग पक्षाच्या हकीकतीप्रमाणे साक्ष दिली नसल्यामुळे त्यांना अभियोगपक्षातर्फे फितुर घोषित करून त्यांचा उलटतपास घेण्यात आला. मात्र उलटतपासात देखील अभियोग पक्षास आरोपीविरूद्ध काहीही निष्पन्न झाले नाही.

**६.** याउलट फिर्यादीच्या उलटतपासात त्याने, घटना दिनांक ११.०४.२०२१ रोजी सायंकाळी ०५.३० वाजण्याच्या सुमारास फिर्यादीच्या घरासमोर मौजे मंगलधाम मंगरूळपीर, ता. मंगरूळपीर, जि. वाशिम येथे घडली, सदर दिवशी, वेळी व ठिकाणी फिर्यादीचा मुलगा व फिर्यादीच्या दिराची मुलगी हे

खेळत असताना फिर्यादीच्या मुलाची बॅट फिर्यादीच्या दिराच्या मुलीला लागली, त्यामुळे फिर्यादीची जाउ संगिता व फिर्यादीमध्ये बोलचाल झाली होती, त्यानंतर फिर्यादीने तिचे सासरे विठ्ठल नारायण गुजरे यांना सांगितले की, ''संगिताला समजावून सांगा, ती माझ्यासोबत वाद करीत आहे'', त्यावर फिर्यादीचे सासरे यांनी फिर्यादीला म्हटले की, ''तु घर खाली कर, तु छिनाल आहे'' व त्यांनी फिर्यादीला चापटाने मारून अश्लील भाषेत शिवीगाळ केली, सदर वेळी फिर्यादीचे पती घरी हजर नव्हते, ते बाहेर गेले होते, या सर्व बाबी तिने स्पष्टपणे नाकारल्या. तसेच, अभियोगपक्षाचे साक्षीदार क्र.२ यानेसुद्धा अभियोगपक्षाची हकीकत नाकारली. त्यामुळे अभियोगपक्षाचे साक्षीदार क्र.०१ व ०२ यांची साक्ष अभियोग पक्षाच्या उपयोगाची नाही.

७. विशेष बाब म्हणजे अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.१ व २ व आरोपी यांच्यामध्ये न्यायालयाबाहेर आपसी तडजोड झाली असल्याची बाब अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.१ व २ यांनी त्यांच्या उलटतपासात कबूल केल्याचे न्यायालयासमोर आले व अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.१ व २ यांनी त्याबाबतचा आपसी तडजोडीचा लेख निशाणी क्र.१७ वर दाखल केला आहे.

८. आरोपीतर्फे निशाणी क्र.१७/१ वर घटनास्थळाचा पंचनामा मान्य करण्यात आला. परंतू अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.१ व २ यांनी अभियोग पक्षाच्या हकीकतीप्रमाणे साक्ष दिली नसल्यामुळे त्यास महत्व प्राप्त होत नाही. सबब, अभियोग पक्षाची हकीकत ही शाबीत झाली नाही. त्यामुळे आरोपीविरुध्द असलेला भा.दं.संहितेचे कलम २९४ व ३२३ अन्वये गुन्हा केल्याचा दोषारोप नि :संशयरित्या शाबीत होत नाही. त्यायोगे आरोपी हा संशयाचा फायदा मिळण्यास पात्र आहे. सबब, वादप्रश्न क्रमांक १ व २ यांचा निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात येत आहेत.

**<u>वादप्रश्न क्रमांक ३ करिता</u> :—**

९. वादप्रश्न क्रमांक १ व २ यांच्या निष्कर्षान्वये आरोपीची निर्दोष मुक्तता करण्याच्या अनुमानास मी पोहचलेलो आहे. त्यामुळे वादप्रश्न क्रमांक ३ चा निष्कर्ष नोंदविण्यासाठी खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१) आरोपी विठ्ठल नारायण गुजरे, याची भारतीय दंड संहिता, कलम २९४, व ३२३ अन्वये गुन्हा केल्याच्या आरोपातून फौजदारी प्रक्रीया संहीता, कलम २५५(१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२) आरोपीचे बंधपत्र व जामीन कदबे रद्द करण्यात येत आहेत.

३) फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७ अ अन्वये आरोपीने जामीनाची पुर्तता करावी

KHAJA CHANDSAB KALAL

Digitally signed by KHAJA CHANDSAB KALAL
Date: 2026.07.16 17:40:52 +0530

दिनांक : १६/०७/२०२६

**(ख्वाजा चाँ. कलाल)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मंगरूळपीर,
ता. मंगरूळपीर, जि. वाशिम.

| **CERTIFICATE** | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word as per the original order. | | |
| Name of Court | :- | Jt. Civil Judge (Jr.Dn.) and J.M.F.C., Mangrulpir, Dist. Washim. |
| Presiding Officer | :- | Khwaja C. Kalal |
| Judgment/Order uploaded by | :- | Shri. S. S. Rathod (Jr. Clerk) |
| Date of Judgment/Order | :- | 16/07/2026 |
| Judgment/Order signed by the presiding officer on | :- | 16/07/2026 |
| Judgment/Order uploaded on | :- | 16/07/2026 |